(17)

No. BMRDA/MTG/22.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan, 5th Fl.,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 28th October, 1980.

The minutes of the 22nd meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 7th October, 1980, are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

( B. S. PRADHAN )
Secretary,
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members and Permanent Invitees.

The Officers of the B.M.R.D.A.

# MINUTES OF THE TWENTY-SECOND MEETING OF THE B.M.R.D.A.

Date : 7th October, 1980.

Time : 11.00 A.M.

Place : The Auditorium of the Jamnalal Bajaj Institute, Behind Mantralaya, Bombay.

A list of members present is enclosed.

2. The Minister in his opening speech explained the role of the BMRDA pointing out that the BMRDA is essentially a planning and coordinating Authority and the Act itself has put restrictions on the BMRDA in the execution of projects - especially works which fall within the obligatory and discretionary duties of the Bombay Municipal Corporation. He referred to some of the important projects of the BMRDA such as the Bombay Urban Transport Project and the Bombay Metropolitan Region Water Supply and Sewerage Project for which the World Bank loans have been secured, the Bandra-Kurla Project, the Truck Terminal Project and the Inland Water Transport Project for which the Govt. of India is likely to give assistance.

3. He also complimented the CIDCO for the good work being done by it.

4. After the Minister's speech, the members raised the following points for discussion.

(1) Building Restrictions in Rural Areas :-

Shri Prabhakar Patil complained that since the establishment of the BMRDA, restrictions have been imposed on buildings etc. even in outlying villages in Kulaba District. Every building application is being referred to the BMRDA and as a result, all development has slowed down. The Metropolitan Commissioner subsequently explained that the BMRDA had imposed no restrictions on development. Actually whoever wants to undertake any non-agricultural development, has to apply to the Collector for permission under the Land Revenue Code and while granting such permission, the Collector has also to examine under section 18 of the M.R.T.P. Act, 1966 that the proposed development

does not ...

does not conflict with the Regional Plan. Instructions have been issued to the Collectors that they need not refer such cases to the BMRDA.

(2) Problems of Fishermen :

Shri Thanekar, Chairman of the Improvements Committee, Bombay Municipal Corporation, referred to the problem of fishermen in Bombay who had no space for operations like drying their nets, fish etc. The Metropolitan Commissioner stated that the BMRDA is equally conscious of the problems of the fishermen, and has constituted a Study Group under Dr. Kulkarni, a retired Director of Fisheries, Government of Maharashtra, to study this problem.

The BMRDA has also agreed to the development of Fishing Harbour at Sasson Docks, but the project has been held up because of a stay from the Government of India.

(3) Shifting of Markets :

Following points were raised :-

(i) Some of the members referred to the need for retaining the vegetable markets in Bombay.

(ii) Because of the changes in Government policies from time to time in the shifting of markets, there is some confusion in the minds of the people.

(iii) In the shifting of markets adequate provisions should be made for the housing of workers. There was also a complaint about the increasing cost of the tenements being constructed by CIDCO.

(iv) To create a wholesale flower market in Bombay.

The Metropolitan Commissioner explained that the shifting of markets is to be undertaken in accordance with the recommendations made by this Authority and that there will be no change in this policy except in respect of the vegetable and fruit markets, which will be

shifted....

shifted to some place in Greater Bombay instead of Vashi.

As for the housing for workers, the Metropolitan Commissioner explained that the CIDCO had already constructed about 200 tenements and more will be constructed. As regards the price of the tenement this was a part of the increase in prices which cannot be helped but in any case he assured the meeting that the increase in price is not due to profit making.

As regards the flower market, the Metropolitan Commissioner said he agreed with the proposal but the details about the location of the market etc. should be worked out by the Bombay Municipal Corporation and the BMRDA would cooperate in this matter.

(4) Slums :

Several members including Shri Koparde, Shri Amarnath Patil and Shri Tripathi raised the problem of slums and the encroachments on Government lands. In particular, they referred to encroachments in -

(1) the Bandra-Kurla area on which we have set so much hope; and

(2) the Dharavi area where encroachments and slums have prevented the completion of the Railway Overbridge. The lands are being used for dumping scrap and waste materials and even for burning tires causing pollution in the area.

(3) Some members also pointed that police assistance was not available for removal of encroachments whenever fresh encroachments were detected.

The Minister (Urban Development) pointed out that the problem of slums is indeed a difficult one and had been raised in other forums also. About police assistance, he suggested that specific cases where police assistance was not available, should be brought to his notice.

The Metropolitan Commissioner pointed out that the primary cause of slums was the uncontrolled influx of people into Bombay that the Government of Maharashtra had some time back appointed a Committee to go into this

question.....

question. Unfortunately, because of the hue and cry raised against the Committee, no further action was taken.

He also mentioned in this connection the haphazard development going on in areas like Mira-Bhayander and other areas of the Bombay Metropolitan Region particularly near Thane and Kalyan, and pointed out the need for an early decision on the Report of the Sathe Commission. He suggested that the Minister should call a small meeting of some of the members of the Authority to discuss this question.

A reference was also made to the reported concentration of leprosy patients in an area to the north-east of Bessain near Valiv-Gokhirvare. This was a grave danger to Public Health. It was suggested that the pollution effect on the Nallas and water streams etc. flowing through this area should be examined.

(5) Unauthorised Conversions :

Shri Dharap raised the question of unauthorised conversion of premises in Greater Bombay for commercial use. The Metropolitan Commissioner informed the meeting that this question has been taken up for study.

(6) Railway Overbridge :

The Railway Overbridge at Dharavi also evoked considerable discussion and several members urged that something should be done to expedite this bridge and to remove the encroachment on both the sides of it.

The meeting then proceeded to discuss the agenda.

Item No. 1 : Confirmation of the Minutes of the last (21st) Meeting of the B.M.R.D.A.

The minutes were confirmed.

Item No. 2 : Action taken report of the Minutes of the last (21st) Meeting of the BMRDA.

Action taken was noted.

Item No. 3 : Extension of Notification under Section 13 of the B.M.R.D.A. Act, 1974.
(Deferred item No.7 of the last meeting)

The meeting approved the item and passed the following Resolutions :

RESOLUTION NO.175 :

RESOLUTION NO. 175 :

Resolved that the Authority, in pursuance of Regulation No. 91 of the BMRDA (Conduct of Business at Meetings) Regulations, 1975 hereby ratifies the decision taken in the following Resolution No. 172 circulated to the Members of the Authority on 14th May, 1980 :

"Resolution No.172:

RESOLVED THAT the Authority, in exercise of its powers under sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, approves of the issue of a Notification appended herewith (Annexure 'C').

RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be authorised to have the said Notification published in the Maharashtra Government Gazette, duly authenticated under his hand in exercise of the powers conferred by Section 7A of the said Act.

RESOLVED FURTHER THAT the foregoing Resolution be placed before the next meeting of the Authority in accordance with Regulation 9 of the B.M.R.D.A. (Conduct of Business at Meetings) Regulations 1975."

RESOLUTION NO. 176 :

Resolved that the Authority in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, approves of the issue of the draft Notification appended as annexure 'E' to the agenda item.

Resolved further that the Metropolitan Commissioner be authorised to have the said Notification published in the Maharashtra Government Gazette, duly authenticated under his hand in exercise of the powers conferred by Section 7A of the said Act.

Item No. 4 : Amendment to BMRDA Notification dated the 10th June, 1977, under Section 13.

The meeting approved the item and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 177 :

Resolved that in exercise of the powers conferred

on it .....

on it under Section 13(1) of the BMRDA Act, 1974 (Maharashtra Act No. IV 1975), the Authority hereby decides that the following explanation shall be added below para 1 of BMRDA Notification, No.MC/RDM/3285/77, dated 10th June, 1977 as extended by BMRDA Notifications No.C/RDM 1079/2695 dated 31st March, 1979 and No.C/RDM 1080/2118 dated the 27th May, 1980 :

> EXPLANATION : "Nothing contained herein shall be construed to authorise the granting of any permission under the foregoing clause (A) or clause (B) which may be in excess of or contrary to any provision of the Dev-elopment Control Rules in Greater Bombay for the time being in force."

Resolved further that the Metropolitan Commissioner be authorised to have the accompanying Notification (Annexure-I) published in the Maharashtra Government Gazette duly authenticated under his hand in exercise of the powers conferred by Section 7A of the said Act.

Item No. 5 : Planning proposals and general note on Bandra-Kurla Complex.
(Deferred item No.5 of the last meeting)

The Committee noted the contents of the note which was for information.

Item No. 6 : Amendment to the BMRDA Notification under Section 13 of the BMRDA Act, 1974 - Reduction in notified area of Bandra-Kurla Complex.

The meeting approved the item and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 178 :

Resolved that the Authority, in exercise of its power under sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, approves of the issue of a Notification appended as Annexure II to the agenda note and authorises the Metropolitan Commission to have the same Notification published in the Maharashtra Government Gazette duly authenticated by him in exercise of the powers under Section 7A of the said Act.

Item No. 7 : Accounts of the Authority for the year 1979-80 and Report of the Financial Adviser thereon.
(Deferred item No. 8 of the last meeting).

The .....

The meeting considered the item note and noted the accounts.

Item No. 8 : Annual Report of BMRDA 1978-79. (Deferred item No.9 of the last meeting).

The meeting considered the draft report and passed the following Resolution :

RESOLUTION No. 179 :

RESOLVED that the Authority approves the draft of the Annual Report of the BMRDA for 1978-79 and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government.

Item No. 9 : Supplementary Budget and Progress Report in respect of schemes included in Annual Works Programme 1980-81

The meeting decided to postpone the consideration of this Item but members made the following points :-

(1) Some members of the Authority expressed a desire to see the site of the Nhava-Sheva Project and the Truck Terminal Project.

(2) The IWT Project should be expedited as it has a potential of expediting movement from Bombay to the other regions of the BMR.

(3) There is a large area near Mulund Station which should be explored as a possible site for new markets.

(4) The Dombivli Station Area Scheme has been approved but has made no progress because of the Railways.

(5) The BMR Water Supply and Sewerage Scheme should be expedited as otherwise the burden on the Municipalities would go up.

Item No. 10 : BMRDA (Contributory Provident Fund) Regulations.

The meeting approved the item and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 180 :

In exercise of powers conferred by Sub-section (2) of the Section 11, read with Section 50 of the Bombay Metropolitan Region Dev-elopment Authority Act, 1974, the Bombay Metropolitan Region Development

Authority ....

Authority resolves that -

(i) the application of the Provident Fund Act 1925 to the Provident Fund established by the BMRDA should be cancelled;

(ii) The Provident Fund of the BMRDA should be got recognised under part 'A' of the Fourth Schedule of Income Tax Act, 1961, and

(iii) "salary" should be defined to include not only Dearness Pay but Dearness Allowance also.

§§§§§§§§§§§§§§

List .....

27

Twenty-Second Meeting of the BMRDA

Date : 7th October 1980.

Members present :

| | | |
|---|---|---|
| 1) | Shri Ramrao W. Adik, Minister for UD & BMRDA | Chairman |
| 2) | Shri Chandrakant Tripathi, Minister of State for Urban Development. | Vice-Chairman |
| 3) | Shri S.H. Bhoir, President of Thane Zilla Parishad. | Member |
| 4) | Shri P.N. Patil, President of Kulaba Zilla Parishad. | Member |
| 5) | Shri V.G. Dharap, Chairman, Standing Committee, BMC. | Member |
| 6) | Shri K.B. Thanekar, Chairman, Improvements Committee, BMC. | Member |
| 7) | Shri M.H. Bedi, Chairman, BEST Committee, BMC. | Member |
| 8) | Shri E.R. Koparde Councillor, BMC. | Member |
| 9) | Shri B.D. Zute, Councillor, BMC. | Member |
| 10) | Shri A.W. Patil, Councillor, BMC. | Member |
| 11) | Shri S.W. Patwari President, Dombivli Municipal Council. | Member |
| 12) | Shri P.H. Advani, President, Ulhasnagar Municipal Council. | Member |
| 13) | Shri A.N. Thakur, Chairman, Uran Panchayat Samiti. | Member |
| 14) | Shri Annasaheb Patil, MLC. | Member |
| 15) | Shri Ram Manohar Tripathi, MLC. | Member |
| 16) | Shri B.N. Adarkar Chairman, T & C Board, BMRDA. | Member |
| 17) | Shri M.S. Palnitkar, Metropolitan Commissioner BMRDA. | Member-Secretary |

-.-.-.-.-.-.-.-

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
२२ व्या सभेचे कार्यवृत्त

दिनांक : ७ ऑक्टोबर, १९८०

वेळ : सकाळी ११.०० वाजता

ठिकाण : जमनालाल बजाज संस्थेचे ऑडिटोरियम
मंत्रालयाच्या मागे
मुंबई.

सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे.

२. आपल्या प्रारंभीच्या भाषणांत मंत्र्यांनी प्राधिकरणाची भूमिका विशद करुन सांगितली. त्यांनी असे सांगितले की प्राधिकरण ही मूलतः एक नियोजन व समन्वय घडवून आणणारी संघटना असून प्रकल्पांच्या विशेषतः मुंबई महानगरपालिकेच्या आवश्यक व इच्छाधीन कर्तव्यांच्या कक्षेत येणाऱ्या कामांच्या अंमलबजावणीबाबत खुद्द अधिनियमानेच प्राधिकरणावर निर्बंध घातले आहेत. जागतिक बँकेने कर्ज दिलेला मुंबई नागरी परिवहन प्रकल्प आणि मुंबई महानगर प्रदेश पाणीपुरवठा आणि मलोत्सर्ग प्रकल्प आणि भारत सरकारचे सहाय्य मिळण्याची शक्यता असलेल्या वांद्रे-कुर्ला प्रकल्प, ट्रक टर्मिनल प्रकल्प आणि अंतर्देशीय जलवहातुक प्रकल्प यासारख्या प्राधिकरणाच्या कांही महत्वाच्या प्रकल्पांचा त्यांनी उल्लेख केला.

३. सिडकोने बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्या संघटनेची मंत्र्यांनी प्रशंसा केली.

४. मंत्र्यांच्या भाषणानंतर सदस्यांनी खालील मुद्दे चर्चेसाठी उपस्थित केले :-

(१) ग्रामीण भागांतील बांधकामावरील निर्बंध.

श्री.प्रभाकर पाटील यांनी अशी तक्रार केली की प्राधिकरणाच्या स्थापनेपासून कुलाबा जिल्हयाच्या वेशीवरील क्षेत्रांतीलही बांधकामावर निर्बंध लादण्यांत आले आहेत. प्रत्येक अर्ज प्राधिकरणाकडे पाठविण्यांत येतो व परिणामतः सर्व विकासाची गति कमी झाली आहे. प्राधिकरणाने विकासावर निर्बंध घातलेले नाहीत असा खुलासा, त्यानंतर, महानगर आयुक्तांनी केला. वस्तुतः ज्या कोणाला बिगर-कृषि स्वरुपाची विकास हाती घ्यावयाचा असेल त्याने जमीन महसूल संहितेनुसार अनुमति मिळविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केला पाहिजे. आणि अशी परवानगी देतांना संकल्पित विकास हा प्रादेशिक योजनेशी विसंगत नाही याची महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ अन्वये खात्री करुन घेतली पाहिजे. अशी प्रकरणे प्राधिकरणाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यांत आल्या आहेत.

(२)मच्छिमारांच्या.....२/-

(२) मच्छिमारांच्या समस्या

मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीचे अध्यक्ष श्री. ठाणेकर यांनी मुंबईतील मच्छिमारांच्या समस्येचा उल्लेख करुन सांगितले की मासे पकडण्याची जाळी किंवा मासळी वाळविण्यासाठी मुंबईत जागा नाही. प्राधिकरणाला मच्छिमारांच्या समस्यांची संपूर्ण जाणीव असून त्यांचा अभ्यास करण्यासाठी प्राधिकरणाने सेवानिवृत्त मत्स्यव्यवसाय संचालक डॉ. कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट स्थापन केला आहे, असे महानगर आयुक्तांनी सांगितले.

ससून डॉक येथे मच्छिमार बंदर विकसित करावयासही प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. पण भारत सरकारकडून स्थगिती आदेश मिळाल्यामुळे प्रकल्प तात्पुरता तहकूब करण्यात आला आहे.

(३) बाजारपेठांचे स्थलांतर

खालील मुद्दे उपस्थित करण्यात आले :-

१) भाजीपाला बाजार मुंबईतच ठेवणे आवश्यक आहे असे कांही सदस्यांनी सांगितले.

२) बाजारपेठांच्या स्थलांतराबाबत शासकीय धोरणांत वेळोवेळी बदल होत असल्यामुळे जनतेच्या मनांत कांहीसा गोंधळ निर्माण झाला आहे.

३) बाजारपेठांचे स्थलांतर करीत असतांना कामगारांच्या निवासाची व्यवस्थित तरतूद करण्यांत यावी. तसेच सिडको बांधत असलेल्या गाळ्यांच्या वाढत्या किंमतीसंबंधीही तक्रार करण्यात आली.

४) मुंबईत घाऊक फूल बाजार निर्माण करणे.

महानगर आयुक्तांनी असा खुलासा केला की, या प्राधिकरणाने केलेल्या शिफारशीनुसार बाजारपेठांचे स्थलांतर करावयाचे असून भाजीपाला व फळ बाजार सोडून इतर बाजाराबाबत धोरणात्मक बदल झालेला नाही. मात्र भाजीपाला व फळबाजार वाशीला हलविण्यांत यावयाचे असून ते बृहन्मुंबईत इतरत्र हलवावयाचे आहेत. कामगारांच्या राहण्याच्या व्यवस्थेबाबत महानगर आयुक्तांनी असा खुलासा केला की, सिडकोने यापूर्वीच सुमारे २०० गाळे बांधले असून आणखी कांही गाळे बांधण्यांत येतील. (बांधकाम साहित्याच्या) किंमतीत वाढ झाल्यामुळे गाळ्यांची किंमत वाढली. त्याला कांही इलाज नाही. मात्र नफा कमाविण्याच्या दृष्टीने किंमती वाढविल्या नाहीत असे त्यांनी सांगितले.

(४) गलिच्छ वस्त्या

श्री. कोपर्डे, श्री अमरनाथ पाटील आणि श्री. त्रिपाठी इत्यादी सदस्यांनी झोपडपट्टीचा व सरकारी जमिनीवरील अतिक्रमणांचा प्रश्न उपस्थित केला त्यांनी विशेषत: खालील ठिकाणच्या अतिक्रमणांचा उल्लेख केला .

१) ज्या क्षेत्राविषयी....३/-

१)    ज्या क्षेत्राविषयी आपल्याला येवढी आशा आहे ते वांद्रे-कुर्ला क्षेत्र.

२)    रेल्वेवरील पूल (Railway Overbridge) बांधून पूर्ण करण्याच्या कामी अडथळा आणणारी धारावी मधील अतिक्रमणे आणि झोपडपट्ट्या मोडीत काढलेले लोखंडी सामान किंवा इतर टाकावू वस्तू टाकण्यासाठी किंवा टायर्स जाळण्यासाठी या जागेचा उपयोग करण्यात येतो. या जमिनीचा या कारणासाठी वापर करण्यात येत असल्यामुळे या भागाचे प्रदूषण झाले आहे.

३)    जेव्हा नवीन अतिक्रमणे निदर्शनास येतात तेव्हा ती हटविण्यासाठी पोलिसांची मदत मिळत नाही असे काही सदस्यांनी सांगितले.

नगरविकास मंत्र्यांनी असे सांगितले की, झोपडपट्टीची समस्या निश्चितच गंभीर असून इतर व्यासपीठांवरही त्या बाबत चर्चा करण्यात आली होती. पोलीसांच्या मदती विषयी त्यांनी असे सांगितले की, पोलिसांचे सहाय्य उपलब्ध नाही असे ज्या प्रकरणी सांगण्यात येईल ती प्रकरणे आपल्या निदर्शनास आणण्यात यावी.

महानगर आयुक्तांनी सांगितले की, लोकांचा मुंबईकडे लागलेला अनिर्बंध लोंढा हे झोपडपट्ट्यांच्या वाढीचे प्रमुख कारण होय. त्यांनी पुढे असेही सांगितले की, काही काळापूर्वी या प्रश्नाचा विचार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक समिती नेमली होती. दुर्दैवाने त्या समितीविरुद्ध करण्यात आलेल्या आरडा ओरडीमुळे पुढील कृती करण्यात आली नाही.

या बाबतीत त्यांनी मीरा-भायंदर आणि विशेषतः ठाणे, कल्याण नजीक मुंबई महानगर प्रदेशाच्या इतर क्षेत्रांत होत असलेल्या अनियमित वाढीचा उल्लेख केला आणि साठे आयोगाच्या अहवालावर त्वरित निर्णय घेणे आवश्यक असल्याचें सांगितले. या प्रश्नाचा ऊहापोह करण्यासाठी प्राधिकरणाच्या काही सदस्यांची एक छोटीशी बैठक मंत्र्यांनी बोलवावी अशी सूचना त्यांनी केली.

वाळीव-गोखिव-या नजीक वसईच्या ईशान्य दिशेस एक छोटयाशा क्षेत्रांत महारोगी वस्ती करून रहात असल्याच्या बातमीचा उल्लेख त्यांनी केला. सार्वजनिक आरोग्यास यामुळे गंभीर धोका निर्माण झाला असून या भागातून वाहणा-या नाल्यांच्या व ओढयांच्या पाण्याच्या झालेल्या प्रदूषणाची तपासणी करण्यात यावी अशी सूचना त्यांनी केली.

५.)    बृहन्मुंबईतील इमारतींच्या व्यापारी कारणासाठी होत असलेल्या अनधिकृत परिवर्तनाचा उल्लेख करून या प्रश्नाचा अभ्यास चालू आहे असे महानगर आयुक्तांनी सभागृहास सांगितले.

६)रेल्वेवरील पूल .....४/-

६) रेल्वेवरील पूल : (Railway Over bridge) :

धारावी येथील रेल्वे पुलाबाबतही बराच ऊहापोह झाला. या पुलाचे काम त्वरीत पुरे करण्यासाठी व त्याच्या दोन्ही बाजूकडील अतिक्रमणे हटविण्यासाठी काही तरी केले पाहिजे असे अनेक सदस्यांनी सांगितले.

त्यानंतर सभागृहाने कार्यसूचीवर चर्चा सुरु केली.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या यापूर्वीच्या (२१व्या) सभेच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे.

कार्यवृत्तास पुष्टी देण्यांत आली.

बाब क्र२ : प्राधिकरणाच्या यापूर्वीच्या (२१ व्या) सभेच्या कार्यवृत्तावर करण्यात आलेल्या कार्यवाही विषयी अहवाल.

करण्यांत आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यांत आली.

बाब क्र.3 : प्राधिकरणा अधिनियम १९७४ चे कलम १3 खालील अधिसूचनेच्या मुदतीत वाढ.

सभेने वरील बाबीस मान्यता दिली आणि खालील ठराव संमत केला.

ठराव क्र.१७५ :

असा ठराव करण्यांत येत आहे की मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सभाचे कामकाज चालविणे) विनियम १९७५ मधील विनियम ९ नुसार प्राधिकरण १४ मे १९८० रोजी सदस्यांस पाठविलेला खालील ठराव क्र.१७२ मध्ये घेतलेल्या निर्णयाचे याव्दारा अनुसमर्थन करीत आहे :--

ठराव क्र.१७२ : असा ठराव करण्यांत येत आहे की मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १3 चे पोट कलम (१) खालील आपल्या सर्व अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत असलेल्या सर्व इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण सोबत जोडलेली अधिसूचना (जोडपत्र ..क..) काढण्यास मान्यता देत आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहेकी, उक्त अधिनियमाचे कलम ७अ ने प्रदान केलेले अधिकार वापरुन योग्य त-हेने अधिप्रमाणित केलेली उक्त अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रांत प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांस अधिकार देण्यांत यावा.

पुढे असा ठराव करणंत येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सभेचे काम काज चालविणे) विनियम १९७५ यांतील विनियम ९ नुसार पूर्वगामी ठराव प्राधिकरणाच्या यापुढील सभेपुढे ठेवण्यांत यावा.:

ठराव क्र.१७६....५/-

(३३)

<u>ठराव क्र.१७६ :</u>

असा ठराव करण्यांत येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १३ चे पोटकलम १ ने प्रदान केलेले अधिकार आणि त्याला याबाबत सहाय्यभूत असलेले इतर सर्व अधिकार वापरुन प्राधिकरण याव्दारा जोडपत्र 'ई' म्हणून जोडलेल्या अधिसूचनेच्या मसुद्यास मान्यता देत आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ७अ ने प्रदान केलेले अधिकार वापरुन योग्य त-हेने अधिप्रमाणित केलेली उक्त अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रांत प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांस अधिकार देण्यांत येत आहे.

<u>बाब क्र. ४ :</u> दिनांक १० जून १९७७ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिसूचनेत दुरुस्ती.

---

सभेने बावीस मान्यता देऊन खालील ठराव संमत केला :-

<u>ठराव क्र.१७७ :</u>

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ (१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४) चे कलम १३ (१) ने प्रदान केलेले अधिकार वापरुन प्राधिकरण याव्दारा असा निर्णय घेत आहे की दिनांक ३१.३.१९७९ ची अधिसूचना क्र.सी/आर्डीएम्/१०७९/२६९५ आणि दिनांक २७.५.१९८० ची अधिसूचना क्र. सी/आर्डीएम्-१०८० अन्वये मुदतवाढ केलेली दिनांक १०.६.१९७७ ची अधिसूचना क्र.एम्सी/आर्डीएम्/३२८५/७७ चा परिच्छेद १ ला खालील स्पष्टीकरण जोडले जाईल.

स्पष्टीकरण :- '' सध्या अंमलात असलेल्या बृहन्मुंबईतील विकास नियंत्रण नियमांच्या तरतुदीहून अधिक किंवा विरुध्द असलेल्या कोणत्याही गोष्टीचा अर्थ पूर्वगामी खंड (अ) किंवा (ब) अन्वये अनुमति देण्यासाठी अधिकार प्रदान करणे असा नाही."

पुढे असा ठराव करण्यांत यत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ७अ ने प्रदान केलेले अधिकार वापरुन रीतसर अधिप्रमाणित केलेली व सोबत जोडलेली अधिसूचना (जोडपत्र-१) महाराष्ट्र शासन राजपत्रांत प्रसिध्द करण्याचा अधिकार महानगर आयुक्तांस देण्यांत येत आहे.

<u>बाब क्र.५ : नियोजन प्रस्ताव आणि वांद्रे-कुर्ला समुहावरील सर्वसाधारण टिप्पणी.</u>

सभागृहाने माहितीसाठी प्रसूत करण्यांत आलेल्या टिप्पणीतील मजकुराची नोंद घेतली.

बाब क्र.६.....६/-

बाब क्र. ६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १३ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमांत दुरुस्ती, वांद्रे-कुर्ला समूहाच्या अधिसूचित क्षेत्रांत घट

सभेने बाबीस मान्यता दिली व खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १७८ :

असा ठराव करण्यांत येत आहे की मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम १३ चे पोटकलम (१) खालील सर्व अधिकार व या बाबतीत सहाय्यभूत असलेले इतर सर्व अधिकार वापरून जोडपत्र २ म्हणून सोबत जोडलेली अधिसूचना काढण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे आणि ... अधिनियमाचे कलम ७(अ) खालील अधिकार वापरून महानगर आयुक्तांनी स्वत: अधिप्रमाणित केलेली अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रांत प्रसिद्ध करण्याचा अधिकार महानगर आयुक्तांस देत आहे.

बाब क्र. ७ : १९७९-८० सालचे प्राधिकरणाचे लेखे व त्यावरील वित्तीय सल्लागाराचा अहवाल.

( या पूर्वीच्या सभेपुढील लंबणीवर टाकलेली बाब क्र.८)

सभागृहाने बाबी सोबत जोडलेल्या टिप्पणीवर विचार विनिमय केला व हिशोबाची नोंद घेतली.

बाब क्र. ८ : सन १९७८-७९ चा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा वार्षिक अहवाल.

(यापूर्वीच्या सभेपुढील लंबणीवर टाकलेली बाब क्र.९)

सभेने अहवालाच्या मुद्द्यावर विचार विनिमय केला आणि खालील ठराव संमत केला.

ठराव क्र. १७९ :

" असा ठराव करण्यांत येत आहे की सन १९७८-७९ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालास प्राधिकरण मान्यता देत असून तो राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्तांस अधिकार देत आहे."

बाब क्र. ९ : पूरक अर्थसंकल्प व १९८०-८१ च्या वार्षिक कार्यक्रमांत समाविष्ट करण्यांत आलेल्या योजनांचा प्रगति अहवाल.

सभागृहाने या बाबीचा विचार विनिमय लंबणीवर टाकावयाचे ठरविले पण सदस्यांनी खालील मुद्दे मांडले.

१) काही सदस्यांनी न्हावा-शेवा प्रकल्पाची आणि ट्रक टर्मिनल प्रकल्पाची जागा पाहण्याची इच्छा प्रदर्शित केली.

२) अंतर्देशीय जलवहातुक प्रकल्प त्वरित हाती घ्यावा. कारण त्यामुळे मुंबईपासून मुंबई महानगर प्रदेशातील इतर भागांपर्यन्तच्या वहातुकीस गति येईल.

३) मुलुंड स्टेशननजीक विस्तृत जागा असून तेथे नवीन बाजारपेठा स्थापन करतां येतील की काय ते पहावे.

४) डोंबिवली स्टेशन परिसर योजनेस मान्यता मिळाली आह पण रेल्वेमुळे या योजनेची प्रगति झालेली नाही.

५) मुंबई महानगर प्रदेश विकास पाणी पुरवठा व मलोत्सर्ग योजना त्वरित हाती घेण्यांत यावी कारण तसे न केल्यास नगरपालिकांवरील बोजा वाढेल.

बाब क्र. १० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (अंशदायी भविष्य निर्वाह निधी) विनियम

सभेने या बाबीस मान्यता दिली आणि खालील ठराव संमत केला :

ठराव क्र. १८० :

मुंबई महानगर प्रदेश विकास अधिनियम १९७४ च्या ११ व्या कलमाचे उपकलम (२) आणि कलम ५० या अन्वये प्रदान केलेले अधिकार वापरुन प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की :-

१) भविष्य निर्वाह निधी कायदा १९२५ ची प्राधिकरणास लागू असलेली अंमलबजावणी रद्द करावी.

२) नंतर, आपला भविष्य निर्वाह निधी आयकर कायदा १९६१ परिशिष्ट ४ भाग 'अ' मध्ये समाविष्ट करावा.

३) "वेतनाची व्याख्या अशा तऱ्हेने बदलावी की जेणे करुन महागाई भत्त्यांचा त्यांत समावेश होईल.

दिनांक ७......८/-

दिनांक ७ ऑक्टोबर १९८० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या
२२ व्या सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या नावांची यादी.

| | | |
|---|---|---|
| १. | नगरविकास आणि नवीन वसाहत मंत्री, अध्यक्ष. | श्री. रामराव डब्ल्यू आदिक. |
| २. | नगरविकास आणि नवीन वसाहत राज्यमंत्री, उपाध्यक्ष. | श्री. चंद्रकांत त्रिपाठी. |
| ३. | अध्यक्ष, ठाणे जिल्हा परिषद. | श्री. एस्.एच्.भोईर. |
| ४. | अध्यक्ष, कुलाबा जिल्हा परिषद. | श्री.पी.एन्.पाटील. |
| ५. | अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगर-पालिका | श्री.विनायक धारप. |
| ६. | अध्यक्ष,सुधार समिती, मुंबई महानगर-पालिका. | श्री.क.भा. ठाणेकर. |
| ७. | अध्यक्ष, बीईएस्टी समिती, मुंबई. | श्री.मनमोहनसिंग बेदी. |
| ८. | मुंबई महानगरपालिकेने निवडलेले नगरसेवक | श्री.एकनाथ रामचंद्र कोपर्डे. |
| ९. | ------------''--------------- | श्री.बी.डी.झुटे. |
| १०. | -----------''------------- | श्री.अमरनाथ वा.पाटील. |
| ११. | अध्यक्ष, डोंबिवली नगर पालिका परिषद, जिल्हा-ठाणे. | श्री.श्री.वा पटवारी. |
| १२. | अध्यक्ष, उल्हासनगर पालिका परिषद, जिल्हा-ठाणे. | श्री.पी.एच्. अडवाणी. |
| १३. | अध्यक्ष, उरण पंचायत समिती, जिल्हा-कुलाबा. | श्री. ए.एन्.ठाकूर. |
| १४. | विधान परिषद सदस्य. | श्री. अण्णासाहेब पा. पाटील. |
| १५. | विधान परिषद सदस्य. | श्री. राममनोहर त्रिपाठी. |
| १६. | अध्यक्ष, वहातूक व दळणवळण मंडळ. | श्री. बी.एन्.आडारकर. |
| १७. | महानगर आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि सदस्य सचिव. | श्री. मा.श्री.पळणिटकर. |
| १८. | व्यवस्थापकीय संचालक, सिडको | |
| १९. | सचिव, महाराष्ट्र शासन (नगरविकास) मंत्रालय. | |

एचः २७१०८०.

-------